# बिबट्यांचे खाद्य 'बंदिस्त' करणे हाच समस्येवरील उपाय!

अकोले, १५ जून/वार्ताहर २०१०

जंगलाबाहेरील क्षेत्रात उसाच्या आश्रयाने राहणारे बिबटे जंगलातील बिबट्यांच्या तुलनेत कमी चपळ व काहीसे जास्त वजनाचे ('ओव्हरवेट') आहेत. वन्य प्राण्यांची शिकार करण्याचे कौशल्य आत्मसात नसल्याने या बिबट्यांना पकडून जंगलात सोडले, तरी ते तेथे राहत नाहीत तर परत मागे फिरतात. बिबट्यांना पकडून जंगलात सोडणे हा बिबट्यांच्या समस्येवरील उपाय नव्हे. ऊसक्षेत्रातील बिबट्यांची संख्या मर्यादित करायची असेल, तर त्यांना सहज उपलब्ध असणारे शेळ्या, कुत्री, डुकरे असे खाद्य कसे मिळणार नाही, याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत बिबट्यांच्या अभ्यासक विद्या अत्रेय यांनी व्यक्त केले.

## तीन वर्षांच्या पाहणीतील निष्कर्ष

बंगलोर येथील नॅशनल सेंटर फॉर सायन्सच्या सहकार्याने श्रीमती अत्रेय गेल्या ३ वर्षांपासून बिबट्यांच्या प्रश्नांवर तालुक्यात अभ्यास करीत आहेत. येथील पत्रकारांशी बोलताना त्यांनी आपली निरीक्षणे, निष्कर्षांची माहिती दिली. बिबट्या मार्जार कुळातील प्राणी असल्याने दूर सोडलेली मांजर जशी घरी परत येते, त्याप्रमाणे उसाच्या क्षेत्रात पकडलेले बिबटे जंगलात सोडल्यास मूळ जागी येण्याचा प्रयत्न करतात. नवीन जागा अपरिचित असल्याने त्या ठिकाणी अथवा परतण्याच्या मार्गावर अशा बिबट्याकडून जास्त उपद्रव होण्याचा धोका संभवतो. प्रत्येक बिबट्याचे स्वतःचे असे क्षेत्र असते. एखादा बिबट्या पकडला गेल्यास त्याची जागा दुसऱ्या क्षेत्रातील बिबटे घेतात. मूळ प्रश्न तसाच राहतो. त्यामुळे बिबट्यांना पकडून जंगलात सोडणे हा या समस्येवरील उपाय नव्हे. जंगलाबाहेर उसाच्या आश्रयाने राहणाऱ्या बिबट्यांचे शेळी, कुत्रे, डुकर असे खाद्य असते. जंगलातील माकड, हरीण यासारख्या प्राण्यांची शिकार करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे नसते. त्यामुळे असे बिबटे जंगलात नेऊन सोडले, तरी ते तेथे जास्त काळ टिकाव धरू शकत नाहीत.

अकोले तालुक्याच्या प्रवरा पट्ट्यातील बिबट्यांची संख्या निश्चित करण्यासाठी श्रीमती अत्रेय यांनी 'कॅमेरा ट्रॅपिंग' व डीएनए अशा दोन तंत्रांचा अवलंब केला. तालुक्यातील रूंभोडीपासून ध्रुव ॲकॅडमीपर्यंतच्या (थांदरफळ) २०० चौरस किलोमीटर क्षेत्रात २० बिबटे असल्याचे त्यांना सन २००८मध्ये आढळून आले. त्यातील ७ बिबट्यांचे वास्तव्य अकोले शहराभोवतालच्या परिसरात होते. त्यामुळे रूंभोडीपासून श्रीरामपूर, नेवासापर्यंतच्या प्रवरा खोऱ्यातील ऊसक्षेत्रात सुमारे २०० बिबटे असावेत, असा त्यांचा अंदाज आहे.

बिबट्यांच्या खाद्यामध्ये ६० टक्के वाटा डुकर व कुत्र्यांचा, तर ३९ टक्के हिस्सा शेळ्या-मेंढ्यांचा आहे. मुंगूस, उदमांजर, घूस यासारख्या जंगली जनावरांचे त्यांच्या आहारातील प्रमाण अवघे एक टक्का असल्याचे आढळून आले. त्यामुळे कुत्रे, डुकरे, शेळी, मेंढी यासारखे ऊसक्षेत्रात बिबट्यांना सहज उपलब्ध होऊ शकणारे प्राणी त्यांना खाद्य म्हणून मिळू शकले नाही, तर या भागातील बिबट्यांची संख्या नियंत्रणात येऊ शकेल. शेळ्या-मेंढ्या बंदिस्त जागेत बांधणे, गोठे स्वच्छ ठेवणे अशा उपायांनी हे करणे शक्य आहे. जंगलाबाहेर ऊसक्षेत्रातील बिबट्यांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट करता येणार नाही. त्यांचे अस्तित्व मान्य करूनच 'बिबट्या व मानव' या संघर्षाकडे पाहावयास हवे, असे त्यांनी सांगितले.

### बिबट्याचे 'बोलके चित्रण'!

तीन वर्षांच्या या अभ्यासात श्रीमती अत्रेय व त्यांच्या पथकाला विविध अनुभव आले. बिबट्यांनी मारलेले भक्ष्य तरस पळवितात. ढोकी येथे एका बिबट्याने तरसापासून आपल्या खाद्याचा बचाव करण्यासाठी त्याने मारलेले जनावर थेट झाडावर नेऊन ठेवल्याचे दृश्य कॅमेऱ्यात बंदिस्त झाले. माळीझाप येथील एका बंदिस्त बंगल्याचा जिना चढून एक शेतकरी गच्चीवर जात असताना त्याच जिन्याने दोन बिबटे खाली उतरत होते.

गच्चीचा आपल्या वास्तव्यासाठी उपयोग करणाऱ्या त्या बिबट्यांना पाहून संबंधित शेतकऱ्याची त्रेधा उडाली. वाशेरे गावाजवळील श्रीकृष्णनगरात पावणेसहाच्या सुमारास एक बिबट्या रस्त्यावरून गेला. त्यानंतर १५ मिनिटांनी त्याच रस्त्याने एक दूधवाला गेल्याचे दृश्य कॅमेऱ्याने टिपले. दूधवाल्यास बिबट्याच्या अस्तित्वाची काहीच कल्पना नव्हती.

### बिबट्या चक्कर मारून गेला...

कळस येथे बिबट्याने वासरू मारले होते. मेलेले वासरू मालकाने जमिनीत पुरले. मात्र, आपण मारलेले जनावर खाण्यास बिबट्या त्याच ठिकाणी निश्चित परत येतो. त्यामुळे श्रीमती अत्रेय यांच्या पथकाने त्या शेतकऱ्याला पुरलेले वासरू बाहेर काढून मूळ जागेवर ठेवायला सांगितले. बिबट्याच्या प्रतीक्षेत पथक कॅमेरे लावून जीपमध्ये सज्ज झाले. त्यांच्या अंदाजाप्रमाणे बिबट्या तेथे आला. मात्र, कॅमेऱ्याचा बीप बीप आवाज ऐकून तसाच मागे फिरला. त्याच्या प्रतीक्षेत पथक रात्रभर जीपमध्ये बसून होते. पहाटे बाहेर येऊन आवराआवर करताना जीपभोवती बिबट्याचे ठसे आढळून आले. दबक्या पावलाने आलेला बिबट्या जीपला चक्कर मारून गेला. परंतु जीपमधील लोकांना त्याचा पत्ता नव्हता.

